# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २६३–२०१०/ दिनांक :

श्री. भरत यशवंत शिनगारे,
मु.पो. कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, इस्लामपूर २, जि. सांगली

— विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. भरत यशवंत शिनगारे, मु.पो. कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली यांनी मंचामध्ये दि. १३.१०.२०१० ला गाऱ्हाणे दाखल केले. तक्रारदाराने आपल्या शेतीसाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वितरण कंपनीचे इस्लामपूर उप विभागाकडे अर्ज केला. अर्जासोबत प्रोसेसिंग फी रु. ५०/– पावती क्र. ४८१६३७० दि. ३०.७.२०१० रोजी भरली.

ग्राहकाचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार त्यांना मुदतीत चलन दिले नाही. यापूर्वी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २०.९.२०१० ला तक्रार दाखल केली त्याचे आदेश दि. २७.९.२०१० ला झाले. मंचाकडून अपेक्षित मदत – विहीत मुदतीत चलन न मिळाल्यामुळे भरपाई मिळावी.

वितरण कंपनीने पॅरावाईज कॉमेंटस प्रमाणे आपला दि. २.११.२०१० पर्यंत लेखी अहवाल दिला नाही, परंतु दि. २२.१२.२०१० रोजी मंचासमोर सुनावणीच्यावेळी दिला. त्यामध्ये ग्राहकाचे अंदाजपत्रक दि. ३०.१०.२०१० रोजी मंजूर करुन ग्राहकास पैंसे भरण्यासाठी चलन देणेत आले व ग्राहकाने दि. ३.११.२०१० रोजी पैंसे भरले. ग्राहकास दि. २१.१२.२०१० रोजी कनेक्शन देणेत आले. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी सुनावणीच्यावेळी मंचासमोर अधिकारपत्र दाखल केले. त्यांनी ग्राहकास विद्युत पुरवठा मिळाला असल्याने तक्रार बिनशर्थ मागे घेत असल्याचे वि.प.च्या पत्रावर लिहून दिले. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार दि. ३०.८.२०१० पर्यत चलन देणे आवश्यक होते, परंतु ते दि. ३०.१०.२०१० रोजी देण्यात आले, त्यामुळे २ महिन्यांचा विलंब झाला आहे. परंतु ग्राहकास वीज जोडणी दिल्याने तक्रार बिनशर्थ मागे घेतली आहे, त्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) ग्राहक प्रतिनिर्धीनी तक्रार बिनशर्थ मागे घेत असल्याचे लेखी लिहून दिले असल्याने तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.